# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी . : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
**E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in**

**महावितरण**

कोल्हापूर परिमंडल,
विद्युत भवन", २ रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

संदर्भ क्रमांक : काअ//ग्रातनिमं/ केस क्र.८७/२०१४-१५/४४ दिनांक : ९/०७/२०१५

## आदेश केस क्रमांक ८७/१४-१५

१) श्री. दिगंबर हरी ताम्हणकर
८४७, गावभाग, हरीप्रसाद, महालक्ष्मी वखार — अर्जदार
जि. सांगली.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, सांगली शहर

— पक्षकार

कोरम :- १) श्री. डी. एस. कांबळे, सदस्य सचिव
२) श्री. पी.एस. बुरांडे, सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. डी. एस. कांबळे, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

**तक्रारीचे स्वरुप आणि ग्राहकाची मागणी :-**

श्री. दिगंबर हरी ताम्हणकर, ८४७, गावभाग, हरीप्रसाद, महालक्ष्मी वखार, जि. सांगली ग्राहक क्र. २७९९४०१७९६९१ यांचा दि. २४.२.१५ चा अ फॉर्ममधील अर्ज मंचास दि. ४.३.१५ रोजी प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी यापूर्वी अंतर्गत कक्ष सांगली येथे तक्रार दाखल केली होती. परंतु त्यांना अपेक्षित न्याय न मिळाल्याने त्यांनी या मंचाकडे अर्ज दाखल केला आहे.

**ग्राहकाची मागणी :-**

श्री. ताम्हणकर यांनी बिलापोटी भरलेल्या आगाऊ रकमेवर स न २००७ पासून व्याज मिळावे अशी मागणी केली आहे आणि अंतर्गत कक्षाच्या निर्णयाप्रमाणे दिली जाणारी व्याजाची रक्कम मान्य नसल्याचे कळवले आहे. यावरुन खालील मुद्दा चर्चेसाठी उपस्थित होतो.

प्रश्न :- ग्राहकास त्याचे मागणीप्रमाणे व्याज देणे योग्य आहे का?

उत्तर :- होय.

**कारणमीमांसा आणि चर्चा :-**

सदर तक्रारीची सुनावणी तक्रार क्र. ८७/१४-१५ अंतर्गत दि. २५.६.२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, ताराबाई पार्क कोल्हापूर येथे ठेवण्यात आली होती. तक्रारदार स्वत: श्री. दिगंबर हरी ताम्हणकर आणि वितरण कंपनीतर्फे सौ. एन.आर. शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि वर्षा पाटील, लेखा सहाय्यक (बिलींग) ह्या उपस्थित होत्या. सदर चर्चेदरम्यान अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. शिंदे एन.आर. यांनी श्री. ताम्हणकर यांना ४ टक्के दराने वरिष्ठांच्या आदेशानुसार व्याजाची रक्कम अदा करणेविषयी कळविल्याचे सांगितले. परंतु संगणकीय तांत्रिक अडचणीमुळे व्याज बिलातून देण्यास अडचण येत असल्याचे सांगितले. चर्चेदरम्यान सौ. शिंदे आणि लेखासहाय्यक(बिलींग) वर्षा पाटील यांनी ग्राहकास व्याज देणेसंबंधी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांची माहिती दिली. मंचाने त्यावर समाधान व्यक्त केले. तांत्रिक कारणाने व्याज हे बिलातून देता येत नाही, तसेच आय.टी. तिकीट नं. २६०५१४ दि. २.२.१५ नुसार सदरची बाब मुख्य कार्यालयास कळवल्याचे उपस्थित अधिकारी य ांनी सांगितले. यावर मंचाचे असे मत पडते की, रिझर्व्ह बँकेच्या बँक रेटप्रमाणे ग्राहकास व्याज मिळाले पाहिजे आणि जर तांत्रिक संगणकीय अडचणीमुळे बिलातून सदर रक्कम वर्ग करता येत नसेल तर, योग्य तो पाठपुरावा करुन ग्राहकास दोन महिन्याच्या आत व्याज देणेची व्यवस्था करावी.

## आदेश

१) वि.पु.स. व इतर अटी २००५ चे १५.६.३ प्रमाणे ग्राहकाची तक्रार मंजूर करणेत येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई याजकडे करता येईल.

**(डी. एस. कांबळे)**
**सदस्य सचिव**

**अध्यक्षपद दि. १६.१२.२०१४ पासून रिक्त.**

पी.एस. बुरांडे,
सदस्य

एकमताच्या/बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी.

E:/NAIK STENO/CGRF/CASE ORDERS